# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ६७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/१०/२०१६

**१) ट्रेलर चालकांच्या हयगयीने एस.टी. बसला धडक मारुन नुकसान केले.. :-**

दिनांक १३/१०/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी ईश्वर कवळु मारबते वय ४० वर्ष, रा. राजोला कुही जि. नागपुर हा नागपुर कडुन भंडारा कडे येत असता प्रवासी घेण्याकरीता रोडचे बाजुला आपली बस ऊभी करुन थांबला असता मागेहुन येणा-या आरोपी ट्रेलरचे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे एसटी बस क्र. एमएच ४० एन ८०८९ ला मागेहुन धडक देवुन अंदाजे १०,०००/-रु. चे नुकसान केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) प्रकृती खराब असल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिंनाक. १२/१०/२०१६ रोजी ०६.१५ वा. दर. यातील मृतक भुसाजी गणपत भगत वय ६० वर्ष, रा. सिलेगाव याची प्रकृती खराब झाल्याने त्यास सा. रु. भंडारा येथे उपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे क्र. ००/१६ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. सिहोरा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. कुथे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) विषारी औषध प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान विवाहीतेचा मृत्यु . :-**

दिंनाक. १३/१०/२०१६ रोजी १४.४५ वा. दर. यातील मृतक सौ. पुजा पुरुषोत्तम शेंडे वय २८ वर्ष, रा. धोप हीने विषारी औषध प्राशन केल्याने तीला औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. आंधळगाव येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. परतेकी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता